महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३६ /२०२४ दि. ०६/०३/२०२४

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कापूरबावडी** वाहतूक उपविभागचे हद्दीत श्री नंदीबाबा मित्र मंडळ तर्फे दि. ०८/०३/२०२४ ते दि. ११/०३/२०२४ रोजीपावेतो **'महाशिवरात्री'** निमित्त उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोरून कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माजीवडा मानपाडा प्रभाग समिती समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून तत्वज्ञान सिग्नल मार्गे ब्रम्हांड अथवा आर मॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोलशेत कडून कापूरबावडी सर्कल तसेच माजीवडा मानपाडा प्रभाग समितीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ढोकाळी सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ढोकाळी सिग्नल येथून उजवे वळण घेवून मनोरमानगर मार्गे अथवा लोढा अमाराकडून लोढा बिझनेस डिस्ट्रीक समोरून ब्रम्हांड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) घोडबंदर ठाणे मुख्य वाहिनीवरून नळपाडा सिग्नल येथून डावे वळण घेवून डी मार्ट समोरून कोलशेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने आर मॉल येथून डावे वळण घेवून मनोरमानगर येथून पुढे सरळ जावून ढोकाळी सिग्नल येथून डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) घोडबंदर ठाणे वाहिनी आर मॉल सर्व्हिस रोडने सरळ येवून हॉटेल विहंग इन येथून डावे वळण घेवून पुढे सरळ येवून जोधपूर स्वीटस् येथून डावे वळण घेवून कोलशेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने आर मॉल येथून डावे वळण घेवून मनोरमानगर येथून पुढे सरळ जावून ढोकाळी सिग्नल येथून डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. ०८/०३/२०२४ ते दि. ११/०३/२०२४ रोजी १७:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :— समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner